# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## औरंगाबाद परिमंडळ, औरंगाबाद.

**Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240-2336172**

**Case No: CGRF/AZ/AUR/R/137/2008/58/** **Date:-**

**To,**
**The Executive Engineer ( Administration)**
**O/O Superintending Engineer**
**O&M Rural Circle, M.S.E.D.C.L.,**
**Aurangabad.**

Sub:- Forwarding of grievance in respect of Shri Ramdas Madhaurao Balande, At.Post.Borgaon arj,Tq.Phulambri Daist. Aurangabad. (Consumer No.497350003144)

**Dear Sir**

Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from Shri Ramdas Madhaurao Balande, At.Post.Borgaon arj,Tq.Phulambri. Daist. Aurangabad

You are requested to submit your parawise reply on the grievance within 15 days from the date of this letter

**The hearing of the grievance is fixed on date 14.10.2008 at 13.00 Hrs.**

**Encl As above**.

**Member/Secretary,**
**CGRF(AZ) MSEDCL,Aurangabad.**

Copy to:-
Shri Ramdas Madhaurao Balande,
At.Post.Borgaon arj,
Tq.Phulambri.
Daist. Aurangabad.

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/ग्रामीण/१३७/२००८/५८**

**तक्रार दाखल दिनांक ;- २५/०९/२००८**
**निकाल दिनांक ;- १४/११/२००८**

**श्री रामदास माधवराव बलांडे,**
**मु.पोस्ट बोरगांवराज,**
**ता.फुलंब्री, जिल्हा औरंगाबाद.**
**(ग्राहक क्र.४९७३५०००३१४४) अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित (ग्रामीण मंडळ,)**
**औरंगाबाद. गैरअर्जदार**

| | | |
|---|---|---|
| **कोरम** | **विष्णु अं. हंबिरे** | **अध्यक्ष** |
| | **हेमंत अ. कापडिया** | **सदस्य** |
| | **आ. नि. सोनवणे** | **सदस्य/सचिव** |

# आदेश

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत

तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक २५/०९/२००८ रोजी जालना शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, औरंगाबाद यांना पाठविण्यात आली व या बाबतीत त्यांचे म्हणणे १५ दिवसाच्या आत दाखल करण्याचे सांगण्यात आले. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक १४/१०/२००८ रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) अर्जदाराने घरगुती वापरासाठी महावितरण कंपनीकडुन वीज पुरवठा घेतला असुन त्यांना मीटर वरील रिडींग प्रमाणे बिल आकारणी न करता अदांजे वीज बिल देण्यात आल्याचे अर्जदाराने म्हटले आहे. अर्जदाराने याबाबतीत केलेल्या तक्रारीची दखल घेण्यात न आल्यामुळे त्यांनी मंचात ही तक्रार दाखल केली असुन सुधारीत वीज बिल तसेच नुकसान भरपाई देण्याबाबत आदेश देण्याची विनंती त्यांनी मंचास केली आहे.

२) दिनांक २५/०९/२००८ रोजी झालेल्या सुनावणीच्यावेळी महावितरणच्या नोडल अधिकारी यांनी संबंधीत विभागाकडुन कागद पत्रे मिळाली नसल्याचे सांगुन सुनावणीची तारीख पुढे वाढवण्याची विनंती मंचास केली. मंचाने नोडल अधिकारी यांची विनंती मान्य करीत पुढील सुनावणी दिनांक २१/१०/२००८ रोजी घेण्याचे ठरविले.

३) दिनांक २१/१०/२००८ रोजी नोडल अधिकारी यांनी सुनावणीस उपस्थित राहण्याबाबतचे श्री ए.पी.बन सहाय्यक अभियंता सिल्लोड यांच्यानावे अधिकार पत्र मंचात दाखल केले. पण श्री ए.पी.बन हे सुनावणीस उपस्थित नसल्यामुळे मंचाने महावितरण कंपनीस शेवटची संधी देत सुनावणीची पुढील तारीख ०४/११/२००८ रोजी निश्चीत केली.

४) दिनांक ०४/११/२००८ रोजी झालेल्या सुनावणीस अर्जदार श्री रामराव बलांडे तसेच नोडल अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री ए.पी.बन उपस्थित होते. त्यांनी अर्जदाराच्या तक्रारीवर आपल्या जवाबा सोबत सी.पी.एल., बिल रिव्हीजन इत्यादी कागद पत्रे मंचात दाखल केली. व अर्जदारास देण्यात आलेले चुकीचे वीज बिल दुरूस्त करून सुधारीत बिल देण्याची तयारी दर्शविली. अर्जदाराने महावितरण कंपनीतर्फे त्यांनी वाणीज्य वापराच्या दराप्रमाणे वीज बिल आकारणी करण्यात आल्याचे सांगितले व सुधारीत बिलात व्याज व दंड रद्द करण्यात आले नसल्यामुळे ते मान्य नसल्याचे सांगितले. मंचाने या बाबतीत नोडल अधिकारी प्रतिनिधी यांना आपले म्हणणे पुढील सुनावणीच्या वेळी दाखल करण्याचे सांगत सुनावणी १४/११/२००८ रोजी घेण्याचे ठरविले.

५) दिनांक १४/११/२००८ रोजी अर्जदार व नोडल अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. अर्जदार घरी पिठाची गिरणी चालवत असल्याचे लाईमनने दिलेल्या रिपोर्टवरून त्यांना वाणीज्य वापराच्या दराने वीज बिल आकारणी करण्यात आली असल्याचे तसेच काही काळानंतर हे बिल पुन्हा घरगुती वापराच्या दराने त्याच लाईनमनच्या रिपोर्टवरून आकारण्यात आल्याचे म्हटले आहे. अर्जदार यांनी महावितरण कंपनीचे संबंधीत अधिकारी त्यांना हेतुपुरस्कर त्रास देत असल्याचे सांगत सुधारीत वीज बिल तसेच नुकसान भरपाईची मागणी केली.

६) दोन्ही बाजुकडुन मंचात दाखल झालेल्या कागदपत्रावरून मंचास असे आढळुन येते की, अर्जदारास घरगुती वापरासाठी महावितरण कंपनीकडुन वीज पुरवठा करण्यात आला असुन त्यांना देण्यात आलेला ग्राहक क्रमांक ४९७३५०००३१४४ असा आहे. अर्जदाराच्या सि.पी.एल. वरून जुन २००५ ते जुन २००६ या काळात महावितरण कंपनीतर्फे अर्जदारास वाणीज्य वापराच्या दराप्रमाणे बिल आकारणी करण्यात आलेली आढळते. अर्जदाराने पिठाची गिरणी वापरल्यामुळे लाईनमनने केलेल्या रिपोर्ट वरून ही आकारणी

करण्यात आल्याचे नोडल अधिकारी यांच्या प्रतिनिधीने म्हटले आहे. याबाबत सुनावणीच्या वेळी मंचाने स्थळ पाहणी अहवालाबात विचारले असता तो उपलब्ध नसल्याचे नोडल अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सांगितले. त्याचप्रमाणे अर्जदार हे ह्या काळात पीठाची गिरणी वापरीत होते हे सिध्द करणारी कोणतीच कागदपत्रे ते मंचात दाखल करू शकले नाहीत.त्यामुळे जुलै २००५ ते जुन २००६ या काळात अर्जदार हे वाणीज्य वापरासाठी वीज वापरत होते हे नोडल अधिकारी यांच्या प्रतिनिधीचे म्हणणे मंच मान्य करीत नाही. व अर्जदारास या काळात वाणीज्य वापराच्या दराने केलेली वीज बिल आकारणी चुकीची आहे असे मंचाचे मत आहे.नोव्हेंबर २००७ ते फेब्रुवारी २००८ या काळात अर्जदाराचे मिटर कार्यरत असतांना मिटर रिडींगची नोंद न घेता त्यांना सरासरीवर आधारीत वीज बिलाची आकारणी करण्यात आल्याचे आढळुन येते. नोव्हेंबर २००७ मध्ये रिडींग २६०३ तसेच मार्च २००८ मध्ये रिडींग २८४३ अशी दाखविण्यात आलेली आढळुन येते. यावरून नोव्हेंबर २००७ ते मार्च २००८ या काळात अर्जदाराचा वीज वापर (२८४३-२६०३) २४० असा असल्याचे स्पष्ट होते. नोडल अधिकारी यांनी देखील बिल रिव्हीजन करतांना अर्जदाराचा वरील ५ महिन्याच्या काळाचा एकुण वीज वापर २४० युनिट असा घेतला असलेला आढळतो त्यामुळे मंच त्यास मान्यता देत आहे.

वरील सर्व बाबीचे निरीक्षण केल्यावर महावितरण कंपनीतर्फे जुलै २००५ ते जुन २००६ या काळात तसेच नोव्हेंबर २००७ त मार्च २००८ या काळात चुकीच्या वीज बिलाची आकारणी करण्यात आल्याचे स्पष्ट होते.अर्जदाराने महावितरण कंपनीकडुन त्यांना देण्यात आलेल्या चुकीच्या वीज बिलाची तक्रार योग्य असुन अर्जदार त्यांना या प्रती झालेल्या त्रासापोटी नुकसान भरपाई मिळण्यास पात्र आहेत.

मंच याप्रकरणी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

१) महावितरण कंपनीने अर्जदारास जुलै २००४ ते जानेवारी २००६ या काळात वाणीज्य वापराच्या दराने केलेली वीज बिल आकारणी अमान्य करण्यात येत असुन अर्जदारास घरगुती वापराच्या दराने वीज आकारणी करावी.

२) महावितरण कंपनीने नोव्हेंबर २००७ ते मार्च २००८ या काळात अर्जदारास २८० युनिट वीज वापर पाच महिन्यात विभागुन द्यावा.

३) महावितरण कंपनीने वरील (१व२) प्रमाणे अर्जदारास जुलै२००४ ते मार्च २००८ या काळाचे सुधारीत बिल ३० दिवसात द्यावे व या सुधारीत वीज बिलात कोणतेही व्याज व दंड आकारण्यात येवु नये.

४) वरील प्रमाणे देण्यात येणा-या सुधारीत वीज बिलात अर्जदाराने भरलेल्या रक्कमेची वजावट करावी.

५) महावितरण कंपनीने अर्जदारास दिलेल्या मानसीक त्रासापोटी रूपये २५०/- तीस दिवसाच्या आत द्यावे.

वरील आदेशाचे ग्राहक व महावितरण कंपनी यांनी पालन करावे व त्याबाबत मंचास कळवावे.

गा-हाणे निकाली काढण्यात आले असुन हे ग्राहकास व वितरण कंपनीस कळवावे.

| | | |
|---|---|---|
| **हेमंत अ. कापडिया** | **आ. नि. सोनवणे** | **विष्णु अं. हंबिरे** |
| **सदस्य** | **सदस्य/सचिव** | **अध्यक्ष** |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१३७/२००८/५८** **दिनांक ;-**

**प्रति**
**श्री रामदास माधवराव बलांडे,**
**मु.पोस्ट बोरगांवराज,**
**ता.फुलंब्री, जिल्हा औरंगाबाद.**

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/यु/१३७/२००८/५८ )

आपण दिनांक २५/०९/२००८ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

**प्रत,कार्यकारी अभियंता (प्रशासन),**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**म.रा.वि.वि.कं.म.ग्रामीण मंडळ,औरंगाबाद.**

**सदस्य/सचिव**
**ग्राहक गा-हाणे निवारण मंच**
**म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.**

**विद्युतलोकपालाचा पत्ता,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,**
**६०६-६०८, केशवा,**
**बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.**
**दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.**